MHDH060015312022

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २९०/२०२२**

**राजेंद्र रघुनाथ बच्छाव (पाटील) वै.**
**वि.**
**कोणीही नाही**
**कै. रघुनाथ राजाराम पाटील**

**<u>निशाणी क्रमांक १ वर आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन VIII चे कलम २ व ३ प्रमाणे वारसा दाखला मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्ज व अर्जदारांनी अभिलेखावर सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले. अर्जदार यांचे तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. एल. पाटील यांचा युक्तिवाद ऐकला.

**अर्जदार यांचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे :–**

३. अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील मयत कै.रघुनाथ राजाराम पाटील हे मौजे विरदेल ता. शिंदखेडा जि. धुळे येथील कायम रहिवासी होते. ते दि.१४/०१/२००९ रोजी मयत झालेले आहेत. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र.१ ते ३ यांनी त्यांचे वडील कै.रघुनाथ राजाराम पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दाखला मिळण्याकरीता केला आहे. मयत कै.रघुनाथ राजाराम पाटील यांना अर्जदारांव्यतीरीक्त इतर अन्य कोणीही वारस नाहीत. कै.रघुनाथ राजाराम पाटील यांची पत्नी कै.रेशमाबाई रघुनाथ पाटील ह्या दि.२१/०८/२००८ रोजी मयत झालेल्या आहेत. तसेच त्यांचे आई–वडील हेदेखील यापूर्वीच मयत झाले आहेत. कै.रघुनाथ राजाराम पाटील मयत झाल्यावर अर्जदार यांना कायदेशीर वारस लावण्यासाठी कै.रघुनाथ राजाराम पाटील यांचे कायदेशीर वारसांचा वारस दाखला आवश्यक आहे.

४. अर्जदारांच्या मागणी प्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्यासंदर्भात इतर कोणाच्या काही हरकती असतील, तर त्या मागवण्याकरीता 'दैनीक आपला महाराष्ट्र, या वृत्तपत्रात दि.२३.१०.२०२२ रोजी जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. सदर वृत्तपत्राची प्रत प्रस्तुतच्या अर्जात नि.क्र.१९ कडे दाखल आहे. परंतु, प्रस्तुत कामी अर्जदारांच्या अर्जास कोणीही इसमाने हजर होऊन हरकत घेतलेली नाही.

५. अर्जदारांनी अर्जातील कथनांच्या पुष्ट्यर्थ नि.क्र.१३ वर अर्जदार क्र.१ याचे स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामध्ये त्याने अर्जातील कथनांचा पुनरुच्चार केलेला आहे. उपरोक्त तोंडी पुराव्या व्यतिरिक्त अर्जदाराने कागदोपत्री पुरावा देखील सादर केलेला आहे. अर्जदारांनी हजर केलेल्या नि.क्र.१४ व नि.क्र.१५ कडील मृत्यू प्रमाणपत्रांचे अवलोकन करीता असे दिसून येते की, कै.रघुनाथ राजाराम पाटील ह्यांचे दि.१४/०१/२००९ रोजी विरदेल ता.शिंदखेडा जि.धुळे येथे निधन झाले आहे व त्यांच्या पत्नी कै.रेशमाबाई रघुनाथ पाटील ह्यांचे दि.२१/०८/२००८ रोजी विरदेल ता.शिंदखेडा जि.धुळे येथे निधन झाले आहे. तसेच नि.क्र.१६ ते १८ कडे अर्जदाराचे आधार कार्डच्या सत्यापीत प्रती दाखल केलेल्या आहेत. उपरोक्त कागदोपत्री पुरावा हा अर्जदार यांच्या तोंडी पुराव्यास पुष्टी देणारा आहे.

६. अर्जदारांच्या अर्जातील कथनांना व त्यातील त्यांच्या मागणीला कोणीही हरकत घेतलेली नाही. तसेच, त्यांनी सादर केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा हा विनाआव्हानित राहीलेला आहे. त्यामुळे त्यांच्यावरती विश्वास ठेवणे रास्त होईल असे माझे मत आहे. वरील तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरुन असे दिसून येते की, कै.रघुनाथ राजाराम पाटील हे मौजे विरदेल ता. शिंदखेडा जि.धुळे येथील कायम रहिवासी होते. त्यांचा मृत्यू दि.१४/०१/२००९ रोजी विरदेल ता. शिंदखेडा जि. धुळे येथे झालेला आहे. वरील पुराव्यावरुन हे ही स्पष्ट होते की, अर्जदार क्र.१ व २ हे कै.रघुनाथ राजाराम पाटील यांची मुले व अर्जदार क्र. ३ ही मुलगी आहे. कै.रघुनाथ राजाराम पाटील यांच्या पत्नी व आई–वडील देखील यापूर्वीच मयत झालेले आहेत. त्याकारणे, कै.रघुनाथ राजाराम पाटील यांचे पश्चात अर्जदार हे हिंदु वारसा कायद्याप्रमाणे त्यांना सरळ व कायदेशीर वारस आहेत असा निष्कर्ष निघतो. सबब, बॉम्बे रेगुलेशन VIII चे कलम २ व ३ प्रमाणे, अर्जदार हे

कै.रघुनाथ राजाराम पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याचा दाखला मिळण्यास पात्र ठरतात. म्हणून, मी वरील चर्चीत कारणांकरिता पुढील आदेश पारित करीत आहे :–

**–: आदेश :–**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ ते ३ नामे–राजेंद्र रघुनाथ बच्छाव (पाटील), साहेबराव रघुनाथ पाटील(बच्छाव), मिराबाई जगन्नाथ पाटील हे कै.रघुनाथ राजाराम पाटील यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत असे जाहीर करण्यात येते.

३. त्याप्रमाणे अर्जदारांना योग्य तो मुद्रांक शुल्क भरून घेऊन वारस दाखला देण्यात यावा.

सही/–––
(विनिता आ. नाईक)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
शिंदखेडा ता. शिंदखेडा जि. धुळे

दिनांकः ०२/०२/२०२४